(37)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर  **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. वाळूज
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0169  **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/03/2023 00:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार  **Date From (दिनांक पासून):** 04/03/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यत):** 04/03/2023
**Time From (वेळेपासून):** 15:37 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/03/2023  **Time (वेळ):** 00:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/03/2023 00:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळु,औरंगाबाद शहर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** किशोर भास्कर आव्हाळे
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 15,प्लट नं1, गट नं 185 सिडको,महानगर 1, वाळुंज, ,औरंगाबाद,एम. आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 15,प्लट नं1, गट नं 185 सिडको,महानगर 1, वाळुंज, ,औरंगाबाद,एम. आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | API श्री. घुनावत | | | 1. पोस्टे एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपये दराच्या एकुण 20 नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी खाली सही करणार किशोर भास्कर आव्हाळे, वय 45 वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.प्लॉट नं.15, प्लॅट नं.1, गट नं. 185 सिडको महानगर 1, वाळुज, ता.जि.औरंगाबाद मो.क्र. 9923044865
समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 04/03/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती रेश्मा सौदागर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांचे समक्ष वाळुज परिसरात ता. जि.औरंगाबाद येथे एका सुरक्षित ठिकाणी दोन पंचा समक्ष लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे...
मी वरील प्रमाणे असुन सिडको महानगर 1, वाळुज येथे कुटुंबासह राहतो. तसेच व्यापार व्यवसाय करुन माझे कुटूंबाचा उदर निर्वाह करतो.
1.श्री.ज्ञानेश्वर साहेबराव खरात, रा.इंदिरानगर, गारखेडा परिसर औरंगाबाद व 2. श्री.संतोष विश्वनाथ झाल्टे रा. सावित्रीबाई फुले नगर, वडगाव को. औरंगाबाद या दोघांनी ओम साई बिल्डर्स ऍण्ड डेव्हलपर्स या नावाने तिसगाव ता.जि. औरंगाबाद शिवारात शेत गट क्र. 225/5 मधील प्लॉट क्र. 1 ज्याची साईज30*36.8 (1100 चौरस फुट) विक्री संदर्भात माझ्याकडून 251000/- रुपये घेवुन माझी फसवणुक केली होती. त्या संदर्भात मी दिनांक 04/02/2023 रोजी रजिष्टर पोष्टाव्दारे मा.पोलीस निरीक्षक साहेब, पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद यांना फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन माझी रक्कम मला परत मिळावी या बाबत लेखी तक्रार केली होती.
दिनांक 03/03/2023 रोजी दुपारी चार-सव्वा चार वाजेच्या सुमारास मला माझे फोनवर पो.स्टे. एमआयडीसी वाळुज येथुन API श्री घुनावत यांचा 9823427822 या नंबर वरुन फोन आला ते मला म्हणाले की, तुमची तक्रार पो.स्टे.ला पोहचलेली आहे. तुम्ही पोलीस स्टेशनला येवुन भेटा असे सांगितल्याने मी त्यांना लगेच पोलीस स्टेशनला जावुन API श्री. घुनावत यांना भेटलो व माझी 251000/-रुपयाची फसवणुक झाले संदर्भात त्यांना सविस्तर माहिती दिली. त्यावेळी API श्री. घुनावत साहेब मला म्हणाले की, मी तुमची रक्कम 251000/- रुपये तुम्हाल परत मिळवुन देतो त्या करिता तुम्हाला मला 20000/-रुपये दयावे लागतील असे बोलुन माझ्याकडे लाचेची मागणी केली व दिनांक 04/03/2023 रोजी पोलीस स्टेशनला एमआयडीसी वाळुज येथे येवुन भेटण्या बाबत सांगितले. परंतु मला API श्री. घुनावत साहेब यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो आहे. आज दिनांक 04/03/2023 रोजी मला API श्री. घुनावत साहेब, यांनी पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज येथे भेटण्यास बोलावले आहे त्यावेळी ते माझ्याकडे पैश्याची मागणी करुन लाच रक्कम स्विकारणार आहे. माझी API श्री. घुनावत साहेब, पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज यांचेशी कोणत्याही प्रकारचे वैर अगर दुश्मनी नसुन माझा व त्यांचा कोणत्याही प्रकारचा उसनवारीचा किंवा पैसे देण्या-घेण्याचा व्यवहार नाही. तरी API श्री.घुनावत साहेब यांनी माझेकडे लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र. 1 श्री. शेख युनुस शेख युसुफ वय 42 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-शिपाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, व पंच क्र. 2. श्री.अजिमखान महेबुबखान वय 49 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-कनिष्ठ लिपीक, वार्ड नं.5, एन5 सिडको, म.न.पा. औरंगाबाद, असा आमचा ओळख परिचय करुन दिला. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीवर मी, दोन्ही पंचानी व पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी स्वाक्षरी केल्या.
माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी शासकिय पंच व सर्वानुमते पोलीस स्टेशन

एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद शहर येथील API श्री.घुनावत साहेब यांची लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.
त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन पंच क्र. 1 श्री. शेख युनुस शेख युसुफ, यांचेसह आम्हाला माझे खाजगी दुचाकी वाहनाने रवाना केले. आम्ही पो.स्टे.एमआयडीसी वाळुज येथे गेल्यानंतर API श्री. घुनावत साहेब, यांना फोनव्दारे संपर्क केला असता API श्री. घुनावत साहेब, यांनी मला त्यांच्या कक्षात बोलवले त्यावर मी पंच क्र. 1 यांचेसह त्यांचे कक्षामध्ये गेलो सदर ठिकाणी API श्री.घुनावत साहेब मला 1,50,000/-रु व 1,14,000/-रु असे रक्कम असलेले दोन चेक दिले. व त्यानंतर श्री घुनवात साहेबांनी पंच क्र.1 यांचे समक्ष त्यांचे उजव्या हाताच्या दोन बोटाने ईशारा केला असता, मी त्यांना म्हणालो सर,, विस हजारच ना,,, विस थोडे जास्त होवु लागले, त्यावर श्री. घुनावत साहेब म्हणाले .बरोबर आहे ते, काय सोप आहे काय असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना म्हणालो की मी 10000/- रु. आता देतो आणि 10,000/-रु. चेक रिलिव्ह झाल्यावर देतो त्यावर श्री. घुनावत साहेब म्हणाले की, चालल, लगेच आणुन दया असे म्हणुन लाचेची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले आहे., सदर लाचेची रक्कम लगेचच पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज येथे घेवुन येण्याचे सांगितले आहे.
त्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो व सापळा अधिकारी पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांना पंचानी व मी सर्व हकिगत सांगितली त्यावरुन सर्वानुमते लगेचच लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला. सापळा कारवाईच्या वेळी API श्री. घुनावत साहेब यांना लाच म्हणुन देण्या करिता मी हजर केलेली 10000/- रुपये रक्कम ज्यात 500/-रुपये दराच्या 20 नोटा त्यांना ऍन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्रमांक क्र.1 श्री. शेख युनुस शेख युसुफ, असे आम्हाला API श्री. घुनावत साहेब यांचे भेटीकरिता सुरक्षीत ठिकाणावरुन रवाना केले. त्यानंतर मी पंच क्र.1 श्री. शेख युनुस असे मी माझ्या खाजगी वाहनाने पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज येथे API श्री.घुनावत साहेब यांना त्यांचे कक्षामध्ये भेटलो व म्हणालो की, हे घ्या तुम्ही मागितल्या प्रमाणे 10000/-हजार रुपये आहे मोजुन घ्या, असे म्हणुन मी माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यातुन लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून API श्री. घुनावत साहेब यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांनी टेबलावर ठेवलेल्या छोटया निळया रंगाच्या पाऊच मध्ये लाचेची रक्कम ठेवली. त्यानंतर आम्ही पुर्वनियोजीत इशारा केला ती वेळ 15.37 वाजेची होती. सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले. व पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी लोकसेवक API श्री.घुनावत साहेब यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले त्यांना स्वत:चा व पंचाचा परिचय देऊन श्री घुनावत यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मदनसिंग रायसिंग घुनावत, वय 42 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-सहाय्यक पोलीस निरीक्षक, नेमणुक-पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद शहर, रा. दिशा अपार्टमेंट, प्लॅट नं. 201 हर्सुल, जळगाव टि पॉईंट औरंगाबाद, असे सांगितले. त्यानंतर त्यांच्याकडुन लाचेची रक्कम ताब्यात घेऊन श्रीमती रेशमा सौदागर सापळा पथक दोन्ही पंच मी व API श्री. घुनावत साहेब असे तेथुन निघून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय औरंगाबाद येथे आलो. सदर घटनेबाबत सविस्तर पंचनामे करण्यात आलेले आहे.

दिनांक 04/03/2023 रोजी 15.37 वाजेच्या सुमारास एमआयडीसी वाळुज पोलीस स्टेशन येथे API श्री. घुनावत साहेब यांनी त्यांचे कक्षात मी दिलेल्या तक्रारी अर्जाप्रमाणे माझे फसवणुक झालेले 251000/- रुपये मला परत मिळवुन दिले म्हणुन माझ्याकडे त्यांनी 20000/-रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 10,000/-रुपये लाच रक्कम पंचसाक्षीदार यांच्या समक्ष स्विकारली आहे. तरी श्री मदनसिंग रायसिंग घुनावत, वय 42 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद शहर, यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDEEP PANDURANG GURME(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Kishor Amale

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सवाक्षरी)

**Name** (नाव): SANDEEP PANDURAI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI